ISBN-978-81930154-3-5

बी. सी. यु. डी. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

व

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, पारनेर

## आयोजित

एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र ५ जानेवारी, २०१८

# 'आधुनिक महाराष्ट्रातील वंचितांचे इतिहास लेखन'



* आयोजक *

**इतिहास विभाग**

**न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, पारनेर**

जिल्हा अहमदनगर, ४१४३०२ (महाराष्ट्र)

Scanned with CamScanner

बी.सी.यु.डी., सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

व

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, पारनेर

आयोजित

एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

५ जानेवारी २०१८

# “आधुनिक महाराष्ट्रातील वंचितांचे इतिहास लेखन”

आयोजक

❖ इतिहास विभाग ❖

न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, पारनेर

जि. अहमदनगर ४१४३०२(महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | दुसऱ्या महायुध्दाच्या काळातील सोलापूर शहरातील हातमाग कामगारांच्या चळवळी | प्रा. ए. डी. पेरा | ९०-९७ |
| १८ | स्त्रियांचे हक्क व त्यांचे अधिकार डॉ बाबासाहेब आंबेडकर | प्रा. अर्जुन घाटे | ९८-१०० |
| १९ | वंचितांचे समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | प्रा. हरीश मोळके | १०१-१०७ |
| २० | उत्खनन स्थळ हनामगाव | प्रा. एस. व्ही. गागरे | १०८-११० |
| २१ | जुन्नर तालुक्यातील महादेव कोळी समाजाचे उठाव | प्रा. शांता गडगे | १११-११३ |
| २२ | आदिवासी धर्मातील विधी स्थळ, काळ व भाषा | प्रा. एल. वी. काकडे | ११४-११६ |
| २३ | भारतातील आदिवासी चळवळीचा अभ्यास | प्रा. प्रकाश गावित | ११७-१२० |
| २४ | पुणे नगरपालिकेतील ज्योतीराव फुले यांचे योगदान | के. ए. भानवसे | १२१-१२६ |
| २५ | रानाप्रणीत संवादी इतिहास लेखन प्रवाह | ए. एल. भालसिंग | १२७-१३१ |
| २६ | प्राचीन मध्ययुगीन नेवासे | डॉ. वैशाली भालसिंग, प्रा. ए. टी. गंडाळ | १३२-१३८ |
| २७ | वंचितांच्या दृष्टिकोनातून घिसाडी जमातीचे चिकित्सक विवेचन | प्रा. के. एस. पवार | १३९-१४४ |
| २८ | INTERPRETATIONS OF Indian History: COLONICAL Nationalist AND Post Colonical | प्रा. संदिप शिरसाठ | १४५-१५१ |
| २९ | History of Ahmednagar | प्रा. व्ही. एस. पानसरे | १५२-१५४ |
| ३० | राष्ट्रवीर: साप्ताहिक एक उपेक्षित ऐतिहासिक विचारधन | प्रा. विशाल रोकडे | १५५-१५८ |
| ३१ | ब्रिटिश कालीन पेठ तालुक्यातील (नाशिक) डांग सेवा मंडळाचा सामाजिक योगदानाचा अभ्यास | प्रा. एस. व्ही. पोतदार | १५९-१६३ |
| ३२ | आधुनिक महाराष्ट्रातील मानसिक, वंचित इतिहास: एक स्त्री | प्रा. वंदना घोडके | १६४-१६९ |
| ३३ | इतिहास लेखनातील नववनीन विचार प्रवाह व दृष्टिकोन यांचे चिकित्सक मुल्यमापन | प्रा. प्रा. सचिन कांबळे | १७०-१७३ |

# रानाप्रणित संवादी इतिहास लेखनप्रवाह

अजित लक्ष्मण भालसिंग
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
Email : ajitbhalsing999@gmail.com

इतिहास इतिहासकारांच्या मनात झालेली गतकालीन विचारांची पुर्नघडण असते. ऐतिहासिक घटनांना सामाजिक सांस्कृतीक संदर्भ असतात. इतिहास लेखन किंवा इतिहास म्हणजे केवळ घटनावर्णन नसून ते मुख्यत: अन्वयार्थी परिशीलन असते. वादग्रस्त घटितांच्या गराने वेढलेला अन्वयार्थांचा गाभा म्हणजे इतिहास. सर्व इतिहास हा समकालीन असतो या समकालीन असण्याचा अर्थ शोधतांना पुन्हा विशिष्ट विचाराचा, संदर्भाचा त्यावरील असणारा प्रभाव शोधणे निकडीचे ठरते. सत्यशोधन हा इतिहास लेखनाचा मूळ उद्देश असतो. विवेकवादी विचाराने व्यक्तीगत व सामाजिक व्यवहार करणे, परंपरा, धर्म, चालिरीती, रुढी, यांची बुध्दीजीवी चिकित्सा करणे तसेच सामाजिक परिवर्तने होत असतात ती होत असताना त्यासाठी मानवी समूहाने जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. हेतुगर्भकृती, त्याचप्रमाणे सार्वजनीक व वैश्विक- नीतीकल्पनाकडे जाण्याचा प्रयत्न विज्ञान व अनुभवजन्य ज्ञानावर विश्वास असा सर्व घटकांचा अंतर्भाव हा आधुनिकतेत होतो. याच तात्वीक विचारमुल्यावर इतिहास लेखनाची परंपरा विकसित होते. सणसणावळ्या म्हणजे इतिहास ते 'ना साधन ना इतिहास' हे परिवर्तनीय स्वरुपाच्या मुळाशी आधुनिकतेची वैचारीक मुल्ये असल्याचे दिसून येते आणि आज इतिहासाचे मानवी समूहांशी असलेले नाते 'ज्यांना इतिहास नाही, त्यांना भविष्य नाही.' या विचारांशी येऊन थांबते. समाजप्रक्रियेतील इतिहासाचे स्थान अधोरेखीत होते. आधुनिक इतिहासलेखनावर नव सामाजिक मूल्याचा प्रभाव पडल्याचे दिसून येते.

भारतीय इतिहास लेखनाची परंपरा ही मूळत: प्रतिक्रियेतून विकसित झालेली आहे. पाश्चात्यवादी इतिहासलेखना विरुध्दची प्रतिक्रिया म्हणून राष्ट्रवादी इतिहासलेखन पध्दती विकसित झाली. 'क्रियेवर प्रतिक्रिया' या न्यायाने इतिहासाची मांडणी विकसित झाली. त्यानंतर काळानुरुप यामध्ये अनेक इतिहासप्रवाह विकसित झाले. उदा. वसाहतवादी इतिहास लेखन, मार्क्सवादी इतिहासलेखन, रणजीत गुहा यांनी विकसित केलेला 'वंचितांचे इतिहास लेखन' याचबरोबर स्थानिक इतिहास लेखन, प्रादेशिक इतिहास लेखन यासारख्या नानाविध इतिहास लेखन प्रवाहाने इतिहास लेखनाची परंपरा वृध्दींगत केली. प्राचीन ते अर्वाचीन इतिहास लेखनात स्थळ, काळ सापेक्ष परिवर्तने झाली. सामाजिक, आर्थिक,


ISBN No – 978-81930154-3-5

राजकीय, सांस्कृतीक, धार्मिक मुल्यानुसार इतिहास मांडणी काळसुसंगत झाली. आज स्त्री कामगार, संस्था यासारखे घटक इतिहासलेखन परंपरेचे भाग बनले.

महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतीक इतिहासाचे अध्ययन करताना ऐतिहासिक घटीते अभ्यासत असताना आपणाला इतिहास मांडणीत एक साचेबंदपणा आल्याचे दिसून येते. ऐतिहासीक घटीते ही स्थळ व काळ सापेक्ष न अभ्यासता ती मांडणीनुसार व्यक्त केली जातात. 'वर्चस्वयातून लेखन' ही संकल्पना कुठेतरी वृध्दींगत होताना दिसते. त्याचवेळी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात रामचंद्र नारायण चव्हाण म्हणजेच रा.ना. हे आपल्या लेखनातून सामाजिक इतिहासातील अनेक चळवळींना, व्यक्तींना, संस्थांना 'संवादी लेखनाच्या' माध्यमातून यामध्ये समन्वय आणण्याचा प्रयत्न करतात. यातूनच 'रानाप्रणित संवादी इतिहासलेखन' विकसीत होत जाते. रा.ना. संस्कृती, धर्म, चळवळी, संस्था, यासारख्या विविध विषयावर भाष्य करताना त्यामध्ये सुक्ष्म साम्य शोधण्याचा व या साम्यामधुन या दोन घटीतामध्ये संवादी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात हे करत असताना रा.ना. हे तटस्थ, जागल्याच्या, भूमिकेतून त्या घटीताचे चिकित्सक मुल्यमापण करत असतात व त्याचा 'संवादी अन्वयार्थ' मांडण्याचा प्रयत्न रा.ना. करताना दिसतात. 'सामाजिक एकत्व' हा रानाच्या लेखनपध्दती मागचा मूळ हेतू होता.

महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीचे अतिशय चिकित्सक भाष्य रानांनी केलेले आहे. प्रबोधन परंपरेचा विचार समाजात रुजविण्यात रानांनी महत्वाची भूमिका पार पाडली आहे. त्यांच्या मांडणीमध्ये आपल्याला विवेकवाद, सत्यनिष्ठा, सत्यशोधन, तटस्थता, समन्वय, यासारख्या तत्वांचा अंतर्भाव दिसतो. या मांडणीतून आजच्या काळातील कंपू लेखनपध्दतीला राना हे पर्यायी इतिहासलेखन प्रवाह विकसित करीत असल्याचे दिसून येते. संवादी मांडणीतून ते विविध घटीताचे चिकित्सक विश्लेषण करतात. त्याचप्रमाणे सर्वसमावेशक विचार विकसित करतात. रानाची मांडणी ही जातजाणिवेच्या पलिकडची आहे. समाजातील बहुजनांना सतविचाराची ओळख व्हावी हा हेतु होता. रानाचा विश्लेषणाचा आवाका प्राचीन ते अर्वाचीन असल्याचे आपणास त्याच्या लेखनामधून दिसून येते. राना हे समतोल विचार मांडणारे आणि तुलनात्मक पध्दतीचा अवलंब करणारे समन्वयवादी विचारवंत होते.

महाराष्ट्राच्या 'सामाजिक सुधारणा' या धर्मपरिवर्तनाचा बायोप्रॉडक्ट आहे. रानावादातील संत-सुधारक यांच्यातील अभेदयता आधुनिक कालखंडात अधिक प्रभावीपणे अभिव्यक्त होते. धर्माविषयी लिहितांना राना हे 'विवेकवादी धर्म' या संकल्पनेचा पुरस्कार करतात यामध्ये ते कर्म म्हणजे धर्म होय तसेच महापुरुषांची मते म्हणजेच धर्म मते होतात व यातून संप्रदाय विकसित होते. संप्रदाय म्हणजे कर्मठता व यातून विवेक नष्ट होतो. भक्ती म्हणजे सत्य संकलन, सत्यशोधन व राष्ट्रीयता हाच खराधर्म

ISBN No – 978-81930154-3-5



Scanned with CamScanner

हा विवेकी धर्मविचार राना प्रतिपादित करतात. मानवधर्म हा विवेकी धर्म असल्याचे ते सांगतात. राना हे समता तत्वाची मांडणी करत असतात. बुध्द, फुले- आंबेडकर असा वैचारिक सगतेचा अनुबंध ठलगडून दाखवतात. त्याचप्रमाणे बुध्द व गांधी यांच्यातील तात्वीक साम्य राना हे सत्य, अहिंसा, या तत्वाच्या आधारे व्यक्त करताना दिसतात. रानांचे लेखन हे चिंतनशील विचार आहे. सत्यशोधन व अनन्यपार्य हा त्यांच्या मांडणीचा गाभा आहे ते कलाखंडाच्या प्रत्येक मूल्यांचा काळानुरुप संदर्भ घेतात. शिवरायांना ते निधर्मी, लोककल्याणकारी, समतेचे तत्व या सारख्या आधुनिक संकल्पनांच्या माध्यमातून आधुनिक राज्य या संकल्पनेत व्यक्त करतात व प्रबोधन व परिवर्तनाचे शिल्पकार ठरवितात.

तसेच सामाजिक चळवळी या कप्पेबंद पध्दतीने अभ्यासता येत नाहीत राना म्हणतात. सत्यशोधक- ब्राम्हणेत्तर, दलित चळवळ ही एकरेषीय व परस्परपूरक या भूमिकेतून विकसित होते. स्थळ, काळानुरुप संदर्भ बदलतात म्हणून तिचे स्वरुप बदलते म्हणून त्या विभक्त होत नाहीत तर त्या आपल्या मूळविचारांशी एकरुपच असतात. 'बहुजन समाजाला विकासाच्या मुख्यप्रवाहात आणने' हे वरील तीनही सामाजिक चळवळीचे मुख्य तत्व होते तसेच वेळप्रसंगी त्यांनी परस्पर सहकार्याची भूमिका घेतल्याचे व त्यातून एकत्व सिध्द केल्याचे राना दाखवून देतात व या चळवळींना किंवा समताविचाराला संवादीभूमिकेतून अभ्यासण्याची गरज प्रतिपादतात. राना हे व्यक्तीच्या प्रत्येक कृतीला व कार्याला स्थळ व काळाचे संदर्भ असल्याचे नमूद करतात. ते म्हणतात की, 'आजचा पुरोगामी उदयाचा प्रतिगामी असू शकतो' या विचारातून राना हे संत व सुधारकांच्या मर्यादा अधोरेखीत करतात व पण ते काळानुरुप असते हे देखील सांगतात.

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीमध्ये व्यक्तीमध्ये, संस्थांमध्ये, राना संवादीभूमिका विकसित करतात. साहित्य हे समाजमनाचे प्रतिबिंब आहे. बहुजन समाजाविषयी बोलताना राना म्हणतात, 'ज्ञानोबा- तुकाराम' ही सामाजिक ऐक्याची घोषणा आहे असा पहिल्यांदा मर्मभेदी विचार राजारामशास्त्री भागवत यांनी मांडला. तसेच राना म्हणतात कोणत्याही लेखनाला आत्मपरीक्षणाची, आत्मटीकेची निकड असते. यातून चिकित्सक समाजशास्त्रीय, विश्लेषण समोर येते व समाजातील परस्परांमधील मनभेदाची जागा संवाद घेतो व यातून समाजामध्ये एकमय होण्याची प्रक्रिया विकसित होते. राना हे तत्कालीन विचारवंतांनी हेतुपुरस्सरपणे निर्माण केलेल्या वैचारीक विभक्त मांडणीला छेद देऊन संवादी भूमिका/ भूमिकेच्या शक्यता पुराव्यानिशी निर्माण करुन देतात, त्याचप्रमाणे राना हे तटस्थ असतात ते व्यक्तीनिष्ठ, जातनिष्ठ, यांच्याशी बांधलकी न ठेवता ते सत्यनिष्ठ संशोधकाची भूमिका वठवताना दिसतात. राना हे समाजातील सर्व अंतःप्रवाहाचे एकमय पध्दतीने विश्लेषण करुन भाष्यकाराची भूमिका



ISBN No – 978-81930154-3-5

Scanned with CamScanner

पार पाडतात. राना हे प्रबोधनाच्या तत्वज्ञानाचा कालसुसंगत अर्थ लावतात व संवादी व समन्वयवादी विचार वृध्दींगत करतात. राना कुठलाही धर्मप्रवाह किंवा सुधारणाप्रवाह विभक्त पाहत नाहीत तर त्याच्यातील अंर्तप्रवाहातील एकोपा दाखवून देतात.

उदा :- 'राना म्हणतात, आग्नीपुजक वेदापेक्षा भागवतधर्माने कृष्णगीता ही संतानी शिरोधार्य मानली ही धर्मक्रांती होती.'

राना हे आपल्या लेखनामध्ये विविध संदर्भ देतात यामध्ये ते आठवणी/ अनुभव/ स्मरणपत्रे/पत्रव्यवहार / आप्तवाक्य/ संभाव्यता- क्रांतीदर्शीदृष्टीला दिसणारे नवे जग / हा सर्व त्यांचा माहितीकोश होता यामधूनच ते ऐतिहासिक घटीताचे सत्यशोधन करत असत व यातून समन्वयवादी व संवादी भूमिकेच्या शक्यता, निर्माण करतात. आजच्या काळात स्वमतं, स्वविचार, अस्मिता, आत्मकेंद्री, कप्पेबंदपणा, विसंवाद, यासारख्या अनिष्ट मुल्याचा सामाजिक व्यवहारामध्ये हस्तक्षेप वाढला आहे. त्यामुळे विद्रोहीकृत्याला चालना मिळत आहे. परस्परप्रेमाची जागा मत्सराने, द्वेषाने घेतली आहे. सामाजिक एकोपा, सांमजस्य, संवादी भूमिका आजची गरज बनली आहे. आज धर्मांध- धर्मनिरपेक्ष, पुरोगामी, प्रतिगामी हा भेद न करता समाजहितासाठी, राष्ट्रहितासाठी, व स्वहितासाठी आपल्या परस्परांमध्ये समन्वय व संवाद ठेवणे निकडीचे आहे. थोडक्यात काय तर समाज परिवर्तनासाठी विद्रोहाचे मुल्य हे असतेच पण विद्रोह हा विधायक असायला हवा त्याच प्रमाणे विद्रोहापूर्वी व विद्रोहनंतरही संवाद व समन्वय असावा यातून राष्ट्र, समाजउभारणीला बळकटी येते. जातीयता, दहशतवाद, भ्रष्टाचार, यासारख्या समस्यांना सोडविण्यासाठी संवादी विचारांची अत्यंत गरज आहे. संवाद हे विकास व परिवर्तन प्रक्रियेचे प्रतिबिंब असते. संवादातून व्यक्ती- समाज, राष्ट्र एकमय होते.


ISBN No – 978-81930154-3-5

संदर्भ ग्रंथ :


१) चव्हाण, रा.ना. 'सत्यशोधक ज्योतिराव फुले' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७४.

२) चव्हाण, रा.ना. "सार्वजनिक सत्यधर्म", महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९७४.

३) चव्हाण, रा.ना., ठोके मो.नि. (संपा.) 'रा.ना.चव्हाण: निवडक वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८६.

४) वांबूरकर, जास्वंदी (संपा) 'इतिहासातील नवे प्रवाह', डायमंड पब्लिकेशन, पुणे ऑगस्ट, २०१४.

५) चव्हाण, रा.ना., डॉ.एस.एस.भोसले (संपा), 'परिवर्तनाची क्षितीजे: महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९.

६) चव्हाण, रा.ना., रमेश चव्हाण (संपा), 'अक्षरवेध', जून -२०१३.

७) चव्हाण,रा.ना., रमेश चव्हाण (संपा), 'संत सुधारक व त्यांचे धर्मविचार एक अभ्यास, २९ ऑक्टो. २०१३.

८) चव्हाण, रा.ना., वैशाली चव्हाण (संपा), 'प्रबोधन समाज प्रबोधन व परिवर्तन : एक ऐतिहासिक चिंतन', १०एप्रिल १९९९.



ISBN No – 978-81930154-3-5

Ahmednagar Jilha Maratha Vidya Prasarak Samaj's

# New Arts, Commerce & Science College

Parner, Dist- Ahmednagar- 414302 (M.S.)

# CERTIFICATE

This is to certify that Dr./ Prof./Mr./~~Ms~~ Ajit Laxman Bhalwing of Savitribai Phule Pune University, Pune

Participated/ Presented research paper /as a Resource Person / as a chair Person/ Research Student in the National Seminar on' The Writing of Subaltern History in Modern Maharashtra' on 5th January, 2018.

Prof. Bhimraj Kakade
Convenor

Dr. Rangnath Aher
Principal